राज्यातील सर्व खाजगी शासन अनुदानित आयुर्वेदिक व युनानी महाविद्यालय व रुग्णालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन ( पेन्शन ) व मृत्यू- नि - सेवानिवृत्ती उपदान (ग्रॅच्युईटी ) लागू करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एडीआर २०१६/प्र.क्र.४१/आयु-२**
**९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,**
**लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४००००१**
**तारीख: १० ऑगस्ट, २०१६**

**वाचा :**

१ शासन निर्णय वै.शि.व.औ.द्र.विभाग क्रमांक शामाप-२०१२/प्र.क्र.१८१/१२/आयु-२, दि.१२.११.२०१२.

२ शासन निर्णय वै.शि.व.औ.द्र.विभाग क्रमांक एडीआर-२०१०/प्र.क्र.६१(भाग-२)आयु-२, दि. ०४.०३.१४.

३ शासन निर्णय वै.शि.व.औ.द्र.विभाग क्रमांक एडीआर-२०१३/प्र.क्र.५६/१३/आयु-२ दि. १७.०१.२०१५.

४ शासन निर्णय वै.शि.व.औ.द्र.विभाग क्रमांक एडीआर-२०१३/प्र.क्र.५६(भाग-२)आयु-२ दि. ११.०४.१६.

५ शासन निर्णय वै.शि.व.औ.द्र.विभाग क्रमांक एडीआर-२०१३/प्र.क्र.५६/१३/आयु-२ दि. ११.०४.२०१६.

६ शासन निर्णय वै.शि.व.औ.द्र.विभाग क्रमांक एडीआर-२०१३/प्र.क्र.५६(भाग-२)आयु-२ दि. ०३.०५.१६.

७ शासन निर्णय वै.शि.व.औ.द्र.विभाग क्रमांक एडीआर-२०१३/प्र.क्र.५६/१३/आयु-२ दि. ०३.०८.१६.

**प्रस्तावना :-**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत खाजगी शासन अनुदानित १६ आयुर्वेद, ३ युनानी व १ रुग्णालय अशा एकूण २० खाजगी शासन अनुदानित संस्था आहेत. तसेच या संस्थांमध्ये २२१३ शिक्षक व शिक्षकेत्तर शासनमान्य पदे आहेत. अल्पशुल्कात रुग्णांना सेवा उपलब्ध होत असल्यामुळे लोकहितास्तव संस्थाची आर्थिक

अक्षमता विचारात घेऊन दिनांक १ जानेवारी, २००४ पासुन १०० टक्के वेतन अनुदान शासनाकडून दिले जात आहे. या संस्थांमधील कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू नाहीत. मात्र या कर्मचा-यांना अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना (CPF) लागू आहे. मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे सेवानिवृत्तीवेतन व उपदान योजनेचा लाभ मिळण्याबाबत दाखल याचिका क्रमांक ५७७१/२०११ यामध्ये मा.न्यायालयाने दि.१०.०६.२०१३ रोजी दिलेल्या न्याय निर्णयानुसार शासनाने संदर्भाधीन ३ येथील शासन निर्णयान्वये विदर्भ विभागातील ४ याचिकाधारक संस्थांमधील दि. ०१.११.२००५ पुर्वी नियुक्त व निवृत्त शासनमान्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना विहित थकबाकीसह निवृत्ती वेतन व उपदान योजना मंजूर केली आहे.

२. तद्नंतर राज्यातील इतर खाजगी शासन अनुदानित संस्थेतील सेवानिवृत्त व इतर कर्मचा-यांनी तसेच संस्थांनी सेवानिवृत्तीवेतन व उपदान योजनेचा लाभ मिळण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई तसेच औरंगाबाद व नागपूर खंडपीठात न्यायालयीन याचिका दाखल केल्या होत्या. मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे न्या.याचिका क्र.८२०/२०१५, राधाकृष्ण तोष्णीवाल आयुर्वेद महाविद्यालय, अकोला विरुध्द शासन व इतर सोबत इतर संलग्नित प्रकरणी (न्या.याचिका क्र.१२८१/२०१५, १४८०/२०१५, २३०४/२०१५, २३१५/२०१५, २३२०/२०१५ व ४०९७/२०१५) शासनाने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका ११८७८/२०१६ दाखल केली होती. सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१२.०४.२०१६ रोजी निर्णय देऊन याचिका खारीज करुन याचिकादारांना सेवानिवृत्ती व उपदान योजना ६ आठवड्यात लागू करावी असा निर्णय दिला होता. सदर कालावधी दि.२४.०५.२०१६ रोजी संपूष्टात आला आहे. तसेच अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयातील मयत कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसांना कुटूंब निवृत्तीवेतन मिळणेबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे याचिका क्र.९६३/२०१६, दाखल केली होती.

३. मा.उच्च न्यायालय, मुंबई तसेच विविध खंडपीठात दाखल झालेल्या याचिकांवरील आदेशांचे विहित मुदतीत पालन न झाल्याने अवमान याचिका क्र.५५/२०१६ इन रिट पिटीशन क्र.५३२७/२०१५, अवमान याचिका क्र.६०/२०१६ इन रिट पिटीशन क्र.४७७७/२०१५ व इतर ५ संलग्नीत याचिका व अवमान याचिका क्र.१७९/२०१६ इन रिट पिटीशन क्र.१४८०/२०१५ मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे झाल्या होत्या. सदर अवमान याचिकांप्रकरणी मा.न्यायालयाने दि. ०५.०७.२०१६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार १ महिन्याच्या आत शासन निर्णय दि. १७.०१.२०१५ व ११.०४.२०१६ सुधारित करुन पुर्तता अहवाल दि. १६.०८.२०१६ पुर्वी मा.उच्च न्यायालयात सादर करण्याबाबत आदेश दिले आहेत.

४. मा.उच्च न्यायालय, मुंबई व खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे एस.एल.पी क्र.१०४६२/२०१६ शासन विरुध्द एस.पी.फडके, एस.एल.पी.क्र.१०४९१/१६ शासन विरुध्द ॲक्शन ग्रूप या दोन एस.एल.पी. निर्णयास्तव मा.सर्वोच्च न्यायालयात प्रतिक्षाधीन आहेत. सदरहू प्रलंबित एस.एल.पी.च्या न्याय निर्णयाच्या अधीन राहून, शासनाने खाजगी शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार तसेच मा.उच्च न्यायालयाने अवमान याचिकेमध्ये दिलेला निर्णय विचारात घेऊन या विभागाचे शासन निर्णय दि.१७.१.२०१५ व ११.४.२०१६ हे अधिक्रमित करुन सेवानिवृत्तीवेतन व उपदान लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१) मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे दाखल झालेल्या प्रस्तावनेतील परि.३ येथील अवमान याचिकेमधील दि. ०५.०७.२०१६ च्या न्यायनिर्णयानुसार, तत्कालीन शिक्षण व सेवायोजन विभागाच्या शासन निर्णय दि. २१.०७.१९८३ मधील नमूद तरतूदीनुसार राज्यातील सर्व खाजगी शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी संस्थांमधील दि.०१.११.२००५ पुर्वी नियुक्त शासनमान्य पदांवरील पात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्ती वेतन व उपदान देण्यात यावे. सदर निवृत्तीवेतन व उपदान मा.उच्च न्यायालयाने विविध न्यायालयीन प्रकरणी दिलेल्या न्यायनिर्णयातील नमूद दिनांकापासून देण्यात यावे. तसेच जे कर्मचारी/संस्थेने न्यायालयात याचिका दाखल केली नाही, अशा कर्मचाऱ्यांना सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू राहील.

२) वित्त विभागाच्या दिनांक ३१.१०.२००५ च्या शासन निर्णयान्वये शासनामध्ये दि.१.११.२००५ रोजी व त्यानंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू करण्यात आली आहे. त्याप्रमाणे सोबतच्या “प्रपत्र-ब” मधील एकूण २० संस्थांतील दि. ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वित्त विभागाच्या वरील शासन निर्णयाप्रमाणे परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना (DCPS) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयातील नमूद दिनांकापासून लागू करण्यात यावी. तसेच जे कर्मचारी/संस्थेने न्यायालयात याचिका दाखल केली नाही अशा कर्मचाऱ्यांना सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू करण्यात यावी.

३) मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन प्रकरणी दिलेल्या न्यायनिर्णयातील नमूद दिनांकापासून तसेच ज्या कर्मचाऱ्यांचे वारसदारांनी न्यायालयात याचिका दाखल केली नाही अशा वारसदारांना सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून कुटूंबनिवृत्ती वेतन

योजना लागू करण्यात यावी. सदर योजना दि १.११.२००५.पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना लागू राहील.

४) त्याचप्रमाणे शासन हिस्सा म्हणून असलेल्या उपरोक्त कर्मचा-यांच्या अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना (CPF) मधील रक्कम शासन जमा करण्यात यावी.

५) तसेच सदर कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष निवृत्ती वेतनाचे लाभ ज्या दिनांकापासून लागू आहेत, त्या दिनांकापूर्वीचे कोणतेही लाभ तथा थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.

सदर शासन निर्णयान्वये सर्व संस्थेतील शासनमान्य कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन, उपदान, इत्यादी बाबी लागू करुन संबंधितांस त्याचे लाभ अदा करुन, सदर योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने आवश्यक मार्गदर्शक तत्वे व कार्यपध्दती **प्रपत्र "अ"** मध्ये विहीत करण्यात आली असून, आयुर्वेद व युनानी महाविद्यालय व रुग्णालयाची यादी **प्रपत्र "ब"** येथे जोडली आहे .

सदर बाबीवर होणारा खर्च खालील लेखाशीर्षामधील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा :-

**मागणी क्र.जी - ६ (योजनेतर)**
**२०७१- सेवानिवृत्ती व सेवानिवृत्ती विषयक फायदे**
**(०१) नागरी**
**१०९ - शासन अनुदानित शैक्षणिक संस्थेतील कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन**
**(००) (१०) खाजगी आयुर्वेदिक युनानी महाविद्यालये**
**(२०७१ ०७०२)**
**०४ निवृत्तीवेतन आकारणी**

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९२/सेवा-४, दि.०५.०८.२०१६ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०८१११४०१५६३६१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sadashiv Sambhaji Benake

Digitally signed by Sadashiv Sambhaji Benake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Sadashiv Sambhaji Benake
Date: 2016.08.11 15:18:41 +05'30'

**( सदाशिव सं. बेनके )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत अग्रेषित-

१) मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मुख्य सचिव, यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
४) कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
५) महालेखापाल-१ ( लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र, मुंबई.
६) महालेखापाल-२ ( लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र, मुंबई.
७) वित्त विभाग, वित्तिय सुधारणा-१/व्यय-१३,/सेवा-४, मंत्रालय, मुंबई.
८) सहाय्यक संचालक आयुर्वेद, मुंबई / पुणे / नागपुर
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / कोषागार अधिकारी, नागपूर.
१०) प्राचार्य, सर्व आयुर्वेद व युनानी महाविद्यालये.
११) निवडनस्ती, आयु-२

## शासन निर्णय क्रमांक एडीआर- २०१६/प्र.क्र.४१/आयु-२, दि.१० ऑगस्ट, २०१६ चे प्रपत्र "अ"

i) संबंधित कर्मचा-यांना जुन्या अंशदायी भविष्य निर्वाह निधी ( CPF ) योजनेमध्ये रहावयाचे आहे की सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजनेत सामील व्हावयाचे आहे याबाबत कर्मचा-यांचे स्पष्ट लेखी विकल्प संस्थेमार्फत आवश्यक आहेत.

ii) जे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना स्वीकारतील त्यांना जूनी पेन्शन योजना लागू राहील. त्याप्रमाणे संबंधित कर्मचा-यास भविष्य निर्वाह निधी योजनेचे वर्गणीदार करुन घेण्यासाठी त्यांचे सभासदत्त्वाचे अर्ज संबंधित महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात यावेत. दरम्यान संबंधित कर्मचा-याने अंशदायी भविष्य निर्वाह निधी (CPF) योजनेअंतर्गत यापुर्वीच सेवानिवृत्तीची रक्कम स्वीकारली / घेतली असेल, तर ती रक्कम भनिष्य निर्वाह निधीचे प्रचलित व्याज दराप्रमाणे वसूल करुन शासनाचे जमा लेखाशिर्षाअंतर्गत SBI / RBI बँकेमध्ये चलनाने भरणे क्रमप्राप्त आहे.

iii) सदर रक्कम भरण्याबाबतचे विवरणपत्र विहित पध्दतीत प्राचार्यांनी बनवून, संबंधित प्रादेशिक कार्यालय प्रमुखांनी ( सहाय्यक संचालक आयुर्वेद, मुंबई / पुणे / नागपूर ) यांनी तपासणे आवश्यक आहे. त्यावेळी भविष्य निर्वाह निधी लेखा क्रमांकही आवश्यक आहेत.

iv) कर्मचा-यांकडून जमा करावयाचे रक्कमेसाठी, शासनाकडून जमेचे स्वतंत्र लेखाशिर्ष मंजूर करण्याची स्वतंत्र कार्यवाही करण्यात येत आहे.

v) सदरची जमा रक्कम शासन विहित करील त्या लेखा शिर्षाअंतर्गत जमा करण्यात आली याची नोंद संबंधित महाविद्यालयांच्या प्रार्चायांनी कर्मचा-यांच्या सेवा पुस्तकात घेणे गरजेचे राहील.

vi) सेवानिवृत्त कर्मचा-यांचा व्यवस्थापन हिस्याची रक्कम यापूर्वी पूर्णपणे भरण्यात आली नसेल तर सदर आर्थिक भाराची जबाबदारी संबधित महाविद्यालयाची राहील. त्याचप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचा-याने अंशदायी भविष्य निर्वाह निधी ( CPF ) कर्मचारी हिस्सा भरला नसल्यास त्यास संबंधित कर्मचारी जबाबदार राहील. या दोन्ही बाबींची पुर्तता झाल्याशिवाय निवृत्त वेतन अदायगीबाबतची पुढील कार्यवाही करता येणार नाही.

vii) संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून म.ना.से ( निवृत्ती वेतन ) नियम १९८२ मधील परिशिष्टानुसार निवृत्तीवेतनाबाबतची कागदपत्रे भरुन देण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य यांची असून त्याकरिता त्यांना हा शासन निर्णय

निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन एका महिन्याच्या कालावधीत सदर प्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक राहील. निवृत्ती वेतन प्राधिकृत करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम १९८२ मधील परिशिष्टानुसार कागदपत्रे तपासून संबधित विभागातील महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी सहाय्यक संचालक आयुर्वेद, मुंबई / पुणे / नागपूर यांची राहील. महालेखापाल कार्यालयाकडून निवृत्ती वेतन प्रदानाबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर कोषागार/अधिदान व लेखा अधिकारी कार्यालयामार्फत निवृत्ती वेतन व त्याबाबतचे लाभ अदा करण्यात येतील. निवृत्ती वेतन मिळण्याकरिता संबंधित कर्मचा-यांनी वित्त विभाग शासन निर्णय क्र.निवेयो-१००७/प्र.क्र.१२०/कोषा-प्र.५ दि.१८.०८.२००८ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

viii) याचिकादार संस्थेतील दि.२१.११.२०११ नंतर शासनमान्य पदावरील सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन, वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.३३/सेवा-४ दि. ३०.१०.२००९ व दि.१५.१२.२००९ च्या शुध्दीपत्रकान्वये दिलेल्या सुचनेनुसार निश्चित करावे.

ix) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये संबधित संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची सेवापुस्तके पडताळणी बाबतची विहित कार्यपध्दती अवलंबून , तपासणी करण्याबाबत सहाय्यक संचालक आयुर्वेद, मुंबई / पुणे / नागपूर यांना ( या विषयापुरते ) प्राधिकार प्रदान करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे मुंबई / पुणे व नागपूर विभागांतर्गत कार्यरत असलेल्या संबधित लेखा व कोषागार कार्यालयांतर्गत वेतन पडताळणी पथकाकडून सेवापुस्तक तपासून घेणे आवश्यक आहे. ही कार्यवाही संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य व संबधित सहाय्यक संचालक आयुर्वेद यांचेमार्फत पार पाडावी.

x) कर्मचा-यांची सेवा पुस्तकातील सर्व नोंदी (सर्व वेतन आयोगातील, सेवा नियुक्ती पासून ते सेवानिवृत्ती पर्यंत ) अद्ययावत व परिपूर्ण असल्याची खात्री संबंधित प्राचार्यांनी करावी. त्याची खातरजमा कर्मचा-याचे आस्थापना व वेतन विषयक बाबी पाहणा-या सहाय्यक संचालक आयुर्वेद कार्यालयाने करणे क्रमप्राप्त आहे.

xi) कर्मचा-यांची सेवा पुस्तके सहाय्यक संचालक आयुर्वेद, मुंबई / पुणे / नागपूर यांनी तपासणी केल्यानंतरच कर्मचा-यांचे सेवा पुस्तक पडताळणीसाठी संबधित विभागातील लेखा व कोषागार कार्यालयातील वेतन पडताळणी पथकाकडे पाठवावी. सेवा पुस्तकात

त्रुटी असतील तर त्या संबंधितास कळवून, त्या दुरुस्त करण्यात येतील. त्यानंतर सेवा पुस्तक तपासून संबधितास वर्ग करण्यात येईल.

xii) महालेखापाल कार्यालय, मुंबई / नागपूर हे संबधित कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन अर्ज तपासून, निवृत्ती वेतन मंजूर झाल्याबाबतची निवृत्ती वेतन विषयक कागदपत्रे / आदेश परस्पर संबधित विभागातील कोषागार कार्यालयास पाठवून त्यांची प्रत संबंधित कर्मचा-यांस,कार्यालयास पाठवावी. त्याप्रमाणे संबंधित कर्मचा-याने कोषागार कार्यालयास संपर्क साधून, आपली ओळख पटवून देऊन, पेन्शन अदा करुन घेण्याविषयची पुढील विहित कार्यवाही नियमानुसार करावी. तसेच जे आदेश संबधित प्रादेशिक कार्यालयास कर्मचा-याचे उपदान मंजूर करण्याबाबत प्राप्त झाले असतील ते तपासून संबंधित कर्मचा-यास उपदान प्रदान करण्याबाबतची विहित कार्यवाही संबधित सहाय्यक संचालक आयुर्वेद हे करतील.

xiii) शासन निर्णय वित्त विभाग, दि. १८.०८.२००८ अन्वये निवृत्तीवेतन बँकेमार्फत अदा करण्याच्या संदर्भात कार्यवाही करण्यापूर्वी निवृत्ती वेतन संदर्भातील इतर कार्यवाही (CMP- Cash Management Product etc.) करण्याबाबत संस्था स्तरावर अधिकार संबंधित संस्थेस व पडताळणी करण्याबाबत सहाय्यक संचालक आयुर्वेद, मुंबई / पुणे / नागपूर यांना प्राधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

xiv) जमा रक्कम व खर्च किती झाला याबाबतचा हिशोब / ताळमेळ राखण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करण्याबाबतचे स्वतंत्र आदेश शासनाकडून निर्गमित करण्यात येतील.

xv) संबंधित सेवानिवृत्त कर्मचा-यास सेवानिवृत्त विषयी लाभाची जास्तीची रक्कम अदा होता कामा नये तथा संबधितास कमी रक्कमही अदा होणार नाही याची जबाबदारी संबंधित महाविद्यालय तथा संबधित सहाय्यक संचालक आयुर्वेद यांची राहील.

xvi) संबंधित संस्थेतील सेवानिवृत्त कर्मचा-यांची वेतन पडताळणी पथकाकडून पडताळणी झाल्यानंतर सेवानिवृत्ती वेतनाची प्रकरणे संबधित सहाय्यक संचालक आयुर्वेद यांचे प्रतीस्वाक्षरीने संबंधित महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात येतील.

xvii) सदर शासन निर्णयातील संदर्भाधिन शासन निर्णय अनु क्र. ५ व ६ अन्वये शासनमान्य पदांसाठी निवृत्तीवेतन व उपदान योजना लागू आहे. एखादा कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त न होता, स्वेच्छा सेवानिवृत्तीने / निधन व इतर इ. कारणामुळे सेवानिवृत्त झाला असेल तर त्याबाबत निवृत्तीवेतन अदा करण्याबाबत शासन स्तरावरुन स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

xviii) राज्यातील सर्व शासन अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना अंशदान भविष्य निर्वाह निधी (CPF) योजना लागू असल्यामुळे जे कर्मचारी निवृत्त झाले आहेत त्यांना या योजनेअंतर्गत जमा असलेल्या रकमेचे प्रदान करण्यात आलेले आहे. निवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करावयाच्या शासनाच्या निर्णयामुळे अंशदायी निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत शासन व संस्था हिस्सा अंशदान व त्यावरील व्याज (कर्मचा-यांचा हिस्सा वगळता) ही रक्कम संबंधित कर्मचा-यांनी शासनास परत करणे आवश्यक आहे. कर्मचा-यांना अदा करण्यात आलेली रक्कम ( संस्थेचे अंशदान व त्यावरील व्याज ) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीवर वेळोवेळी ठरविण्यात आलेल्या व्याजाच्या दरानुसार वसुल करण्यात यावी.

तसेच या कर्मचा-यांनी अंशदायी निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत दरमहा मिळणारे सेवानिवृत्ती वेतन घेतले असल्यास ती रक्कम या कर्मचा-यांना त्यांच्या निवृत्ती दिनांकापासुन निवृत्ती वेतन व उपदान योजनेचे लाभ द्यावयाचे आहे. त्यामुळे त्यांना देण्यात येणा-या थकबाकीच्या रकमेतुन ही वसुली समायोजीत / वसुल करण्यात यावी.

ज्या प्रकरणात देण्यात आलेली रक्कम ही द्यावयाच्या रकमेपेक्षा जास्त असून त्या प्रकरणात कर्मचा-याकडून अंशदायी भविष्य निर्वाह निधी मधील व्यवस्थापन हिस्सा व त्यावरील व्याजाची रक्कम जमा करावयाची असून यासाठी नव्याने निर्माण करण्यात येणा-या जमा लेखाशिर्षामध्ये सदरची रक्कम जमा करण्याची कार्यवाही संबधित सहाय्यक संचालक आयुर्वेद यांनी करावी. सदरचे विहित लेखाशिर्ष शासनाकडून स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. संबंधित कर्मचा-यांना अदा करण्यात आलेल्या रकमेचे कागदपत्रे / विवरणपत्रे तपासून सर्व रक्कम समायोजीत / वसुल करण्यात आल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबधित सहाय्यक संचालक आयुर्वेद यांची राहील.

xix) जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांचे अंशदायी भविष्य निर्वाह निधीची खाती (CPF) बंद करण्याची कार्यवाही संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्वरीत करावी तसेच कर्मचा-यांच्या खात्यामध्ये जमा असलेला संस्थेचा हिस्सा व व्याज एकत्रित रक्कम यासाठी नव्याने निर्माण करण्यात येणा-या लेखाशिर्षामध्ये सदरची रक्कम जमा करण्याची कार्यवाही करावी.

xx) कार्यरत कर्मचा-यांच्या बाबतीत अंशदायी भविष्य निर्वाह निधी (CPF) मधील (कर्मचारी हिस्सा) स्वरुपात वैयक्तीक वर्गणीची जमा असलेली रक्कम संबंधित कर्मचा-याचे

सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी (GPF) खाते संबधित विभागातील महालेखापाल यांचे कार्यालयात उघडल्यानंतर सदर खात्यात जमा करावी.

xxi) वर्ग ४ मधील कर्मचारी वगळता इतर कर्मचा-यांचे सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी (GPF) खाते उघडण्याबाबतचा विहित नमुन्यातील प्रस्ताव संबधित सहाय्यक संचालक आयुर्वेद यांनी महालेखापाल कार्यालय, मुंबई / नागपूर येथे सादर करावेत.

दि. ०१.११.२००५ पूर्वी रुजु झालेले व कार्यरत असलेल्या वर्ग ४ कर्मचा-यांचे सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी (GPF) खाते उघडण्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रस्ताव संबंधित संस्थेने, संबधित सहाय्यक संचालक आयुर्वेद कार्यालयाकडे सादर करण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

xxii) सेवानिवृत्त कर्मचा-याने निवृत्ती वेतनासाठी आवश्यक असलेली किमान अर्हताकारी सेवा पूर्ण केलेली असावी.

xxiii) सदरचा शासन निर्णयातील पात्र कर्मचाऱ्यांना केवळ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) १९८२ न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होऊ नये म्हणून लागू करण्यात येत आहे.

Sadashiv Sambhaji Benake

Digitally signed by Sadashiv Sambhaji Benake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Sadashiv Sambhaji Benake
Date: 2016.08.11 15:19:44 +05'30'

**( सदाशिव सं. बेनके )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्रमांक एडीआर २०१६/प्र.क्र.४१/आयु-२, दि.१० ऑगस्ट, २०१६ चे प्रपत्र "ब"**

| अ.क्र. | अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालये तसेच रुग्णालय यांची यादी |
|---|---|
| १ | श्रीमती कमलादेवी गौरीशंकर मित्तल आयुर्वेद महाविद्यालय, मुंबई |
| २ | आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई |
| ३ | कर्मवीर व्यंकटराव तानाजी रणधीर आयुर्वेद महाविद्यालय, बोराडी, धुळे |
| ४ | आयुर्वेद महाविद्यालय, नाशिक |
| ५ | भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी |
| ६ | टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे |
| ७ | गंगाधारशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर |
| ८ | अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे |
| ९ | वसंतदादा पाटील आयुर्वेद महाविद्यालय, सांगली |
| १० | शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय, सोलापूर |
| ११ | आर्यांग्ल आयुर्वेद महाविद्यालय, सातारा |
| १२ | श्री आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर |
| १३ | श्री गुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय, मोझरी |
| १४ | डॉ. डायाभाई मावजी मजिठीया आयुर्वेद महाविद्यालय, यवतमाळ |
| १५ | राधाकृष्ण तोष्णीवाल आयुर्वेद महाविद्यालय, अकोला |
| १६ | विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती |
| १७ | डॉ.इसाक मोहम्मद जामखानवाला तिब्बिया युनानी महाविद्यालय, वर्सोवा, मुंबई |
| १८ | मोहम्मद तिबीया महाविद्यालय, मालेगांव, नाशिक |
| १९ | जुलेखाबाई वली युनानी महाविद्यालय, पुणे |
| २० | शेठ ताराचंद धर्मार्थ आयुर्वेद रुग्णालय, पुणे |

Sadashiv Sambhaji Benake

Digitally signed by Sadashiv Sambhaji Benake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Sadashiv Sambhaji Benake
Date: 2016.08.11 15:20:28 +05'30'

**( सदाशिव सं. बेनके )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**